सकाळ

# वीजपुरवठ्याबाबत अदानींचे आवाहन

मुंबई, ता. २७ : एखाद्या उपनगरात वीजपुरवठा तात्पुरता खंडित होणार असल्याचा अधिकृत संदेश उत्साही वीजग्राहक शहरभर आपल्या मित्रमंडळींना पाठवून देतात. त्यामुळे नंतर उडणारा प्रचंड गोंधळ टाळण्यासाठी ग्राहकांनी जबाबदारीने वागावे, असे सांगण्याची वेळ अदानी इलेक्ट्रिसिटीवर आली आहे. खातरजमा न करता खंडित वीजपुरवठ्याबाबतचे गोंधळ उडवणारे मेसेज पाठवू नका, असे आवाहनच 'अदानी'ने केले आहे. गोंधळामुळे 'अदानी'च्या ग्राहक संपर्क विभागात हजारो ग्राहकांचे दूरध्वनी येऊन बिकट प्रसंग उद्‌भवतो.

Mumbai, Main
28/10/2020 Page No. 102